पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा. महिला व बालकल्याण समिती
कार्यपत्रिका क्रमांक – १८
**सभावृत्तांत**

दिनांक - **१३/०५/२०१५** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. महिला व बालकल्याण समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **१३/०४/२०१५** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा. जाधव साधना रामदास – सभापती**
**२.** मा. सौ.पानसरे अमिना महंमद
**३.** मा. काळभोर वैशाली जालिंदर
**४.** मा. बो-हाडे शुभांगी संजय
**५.** मा. पवार संगीता शाम

या शिवाय, मा.जी.डी.मोरे – मुख्य लिपिक (सभाशाखा), हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचा विषय सभाकामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आला.

विषय क्र.१) सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षात महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम राबविणेबाबत – मा.अमिना पानसरे, मा.शुभांगी बो-हाडे यांचा प्रस्ताव.

---------

खालील प्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक – मा.अमिना पानसरे अनुमोदक – मा.शुभांगी बो-हाडे

मा.महिला व बालकल्याण समितीची दि.१३/०५/२०१५ ची पाक्षिक सभा शनिवार दि.१६/०५/२०१५ रोजी दुपारी ३.०० वा. पर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

**मा.सभापती -** शनिवार दि.१६/०५/२०१५ रोजी दुपारी ३.०० वा. पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

( जाधव साधना रामदास )
**सभापती**
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा. महिला व बालकल्याण समिती
कार्यपत्रिका क्रमांक – १८

**सभावृत्तांत**

( दिनांक १३/०५/२०१५ ची तहकूब सभा )

दिनांक - **१६/०५/२०१५** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. महिला व बालकल्याण समितीची दिनांक **१३/०५/२०१५** ची तहकूब सभा शनिवार दिनांक **१६/०५/२०१५** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. **मा. जाधव साधना रामदास – सभापती**
**२.** मा. सौ.पानसरे अमिना महंमद
**३.** मा. काळभोर वैशाली जालिंदर
**४.** मा. आल्हाट मंदा उत्तम
**५.** मा. सौ.स्वाती प्रमोद साने
**६.** मा. बो-हाडे शुभांगी संजय
**७.** मा. पवार संगीता शाम

या शिवाय मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.ऐवले – समाज विकास अधिकारी, मा.बहाद्दरपुरे – सहा.समाज विकास अधिकारी, मा.जगदाळे – सहा.प्रकल्प अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

दिनांक २२/०४/२०१५ रोजी झालेल्या सभेचा **( कार्यपत्रिका क्रमांक १७ )** चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेला विषय घेणेत आला.**

ठराव क्रमांक : २४ विषय क्रमांक : १
दिनांक : १६/०५/२०१५
सुचक : मा.अमिना पानसरे अनुमोदक : मा.शुभांगी बो-हाडे
संदर्भ :- मा.अमिना पानसरे, मा.शुभांगी बो-हाडे यांचा प्रस्ताव –

मा.महिला व बालकल्याण समिती ठराव क्रमांक २१, दि.२२/०४/२०१५ रद्य करणेत येत असून त्या ऐवजी खालीलप्रमाणे ठराव करणेत येत आहे. नागरवस्ती विकास योजना विभागाकडील महिला व बालकल्याण योजने अंतर्गत महिला व मुले / मुलींसाठी विविध प्रकारच्या कल्याणकारी योजना राबविल्या जातात. त्यातील " महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम " ही योजना असून गेल्या दोन वर्षापासून ती मनपा स्तरावर राबविण्यात येते. सदरची योजना गेल्या दोन वर्षापासून मे.अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत चांगल्या प्रकारे राबविली आहे. आवश्यकतेनुसार तात्काळ मनुष्यबळाची उभारणी करणेची क्षमता तसेच मोठया प्रमाणावरील कामकाज करणेसाठी आवश्यक असलेली आर्थिक क्षमता व विशेषकरुन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील वस्तीपातळीवरील प्रशिक्षण घेण्याचा अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेला भरपूर अनुभव आहे. त्यानुसार तातडीने योजना सुरू होणेकामी, संस्था निवडीसाठी लागणारा प्रदिर्घ कालावधीचा विचार करता मे.अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, पुणे यांचे मार्फत थेट पध्दतीने मनपा स्तरावर संस्थेमार्फत सादर दर, विषय, शैक्षणिक अर्हता, प्रशिक्षण कालावधी, प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम इत्यादीची खातरजमा करुन दि.३१/०३/२०१६ अखेरपर्यंतच्या कालावधी पर्यंतचे प्रशिक्षणाचे काम करता मे.अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, पुणे यांचे मार्फत देणेस मान्यता देणेत येत आहे व सदरची योजना ही मनपा स्तरावर, मनपाच्या यापूर्वीच्या मान्यता (धोरण) / कार्यपध्दतीनुसार राबविण्यात यावी. यामध्ये आवश्यकतेनुसार बदल / दुरुस्ती करण्याचे अधिकार मा.आयुक्त यांना देणेस मान्यता देणेत येत आहे. प्रशिक्षणास इच्छुक महिला ही प्रशिक्षण विषयानुसारचा अभ्यासक्रम / प्रशिक्षणात शिकविण्यात येणा-या बाबी, गरज / आवश्यकता, व्यवसाय करणेसाठी त्याची उपयुक्तता इत्यादीचा तसेच करावयाचा कोर्स हा कोर्ससाठी असणा-या त्या त्या कालावधीनुसार करणे आपल्याला जमेल का ? याचा विचार करुनच एकूण प्रशिक्षण शुल्काच्या १०% इतकी होणारी रक्कम भरुन प्रशिक्षणात सहभागी होत असते. मात्र प्रशिक्षणास विषयानुरुप शैक्षणिक अर्हता ठेवल्यास त्या त्या विषय निहाय प्रशिक्षणासाठीची विशिष्ट अशी शैक्षणीक अर्हता नसल्यास अथवा थोडीफार कमी असल्यास ते प्रशिक्षण घेण्याची क्षमता / इच्छा असून देखील विशिष्ट अशा शैक्षणीक अर्हते अभावी त्या महिलेस प्रशिक्षणात सहभागी होता येत नाही. त्यामुळे इच्छुक महिला प्रशिक्षणापासून वंचित राहते. महिलांच्या सबलीकरणाच्या / सक्षमीकरणाच्या उद्देशाला सदरची बाब बाधक आहे. म्हणून शैक्षणिक अर्हततेच्या पुराव्याची अट कुठल्याही कोर्सेसला न लावता सर्व कोर्सेसला साक्षर अशी अट लावणेस मान्यता देणेत येत आहे. म्हणजे कोर्स करायची इच्छा असलेली कुठलीही साक्षर महिला प्रशिक्षणापासून वंचित राहणार नाही. सदरचे प्रशिक्षण हे संस्थेमार्फत सादर अभ्यासक्रमानुसार व प्रस्तावा सोबतच्या प्रपत्र – अ मध्ये नमुद केलेनुसार प्रशिक्षण विषय, शैक्षणिक अर्हता, कालावधी ( दिवस/तास ) प्रशिक्षण शुल्कानुसार मागील वर्षीच्या कार्यपध्दती व मनपाच्या अटी व शर्तीनुसार पात्र होणा-या महिला / मुलींना मे.अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, पुणे यांचेमार्फत थेट पध्दतीने देण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य

संस्था, पुणे यांचेमार्फत व्यवसाय प्रशिक्षण योजनेअंतर्गत, प्रशिक्षणात भाग घेतलेल्या सर्व लाभार्थ्यांच्या प्रशिक्षणास मान्यता देणेत येत आहे व चालू वर्षी महिलांसाठी ज्ञान कौशल्यवाढ कार्यक्रमांतर्गत प्रशिक्षणात भाग घेणा-या महिलांना एका पेक्षा अधिक प्रकारच्या विषयांचे प्रशिक्षण घेण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच सन २०१५-२०१६ च्या अंदाजपत्रकामध्ये महिला व बालकल्याण योजनेसाठी आर्थिक तरतुद करणेत आलेली आहे. त्यात महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम या उपलेखाशिर्षासह एकूण ४० उपलेखाशिर्षांचा समावेश आहे. तरी महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम या उपलेखाशिर्षावर नागरवस्ती विकास योजना विभागाने उर्वरीत ३९ उपलेखाशिर्षांतर्गत केलेल्या तरतूदींमधून सदर योजनेसाठी लाभार्थ्यांच्या प्रतिसादानुसार प्रशिक्षणाचे खर्चाकामी आवश्यकतेनुसार रकमा वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे व त्यानुसार सदर योजना मे.अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, पुणे यांचेमार्फत दि.३१/०३/२०१६ अखेरपर्यंतच्या कालावधीत राबविणेकामी व योजनेच्या अंमलबजावणीकामीच्या धोरणास व प्रत्यक्ष होणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( जाधव साधना रामदास )
**सभापती**
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/ ३८८ /२०१५
दिनांक : १८/०५/२०१५



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या
कार्यवाहीसाठी रवाना.